# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>
## <u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 20 नोव्हेंबर 2019 रोजी भरलेल्या माहे नोव्हेंबर 2019 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **लक्षवेधी** | |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 1**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 2**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नेरुळ विभागातील नेरुळ गांव सेक्टर-20 येथील जुनी अंगणवाडी तोडुन अंगणवाडीसह बहुउददेशिय इमारत बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/09/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./2060/2019. |
| **ठराव क्र. 1467**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नेरुळ विभागातील नेरुळ गांव सेक्टर-20 येथील जुनी अंगणवाडी तोडुन अंगणवाडीसह बहुउददेशिय इमारत बांधणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 3 कोटी, 4 लाख, 85 हजार, 950 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 3**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राट) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत वैदयकिय अधिकारी/वैदयकिय तज्ञ यांच्या नेमणुकीच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/09/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/ प्रशासन/आस्था-05/प्र.क्र./3068/2019. |
| **ठराव क्र. 1468**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात करार पध्दतीने(कंत्राट) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत वैदयकिय अधिकारी/वैदयकिय तज्ञ यांच्या नेमणुक मिळणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, अ.क्र. 1 ते 5 प्रमाणे वैद्यकिय अधिकारी/तज्ञ यांची नियुक्ती प्राधिकारी ही महानगरपालिका असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(1) अन्वये मान्यता मिळणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 4**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागासाठी एकुण 05 पिकअप वाहने (पिकअप व्हॅन- LCV प्रकारातील वाहन) भाडेतत्तवावर पुरविणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 23/09/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/वाहन/379/2019. |
| **ठराव क्र. 1469**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागासाठी एकुण 05 पिकअप वाहने (पिकअप व्हॅन- LCV प्रकारातील वाहन) भाडेतत्तवावर पुरविणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, 01 वर्षे कालावधीकरीता रक्कम रु. 42 लाख, 80 हजार 850 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 5**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | मा. महासभा, मा. स्थायी समिती, 8 विशेष समित्या, 2 तदर्थ समिती, 8 प्रभाग समित्या आणि परिवहन समिती इत्यादी सभांच्या अनुषंगाने कार्यक्रमपत्रिका, इतिवृत्तांचे सेट काढण्यासाठी सचिव विभागाकरीता दोन नवीन Riso Comcolor मशीन खरेदी करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 01/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/मस/3040/2019. |
| **ठराव क्र. 1470**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "मा. महासभा, मा. स्थायी समिती, 8 विशेष समित्या, 2 तदर्थ समिती, 8 प्रभाग समित्या आणि परिवहन समिती इत्यादी सभांच्या अनुषंगाने कार्यक्रमपत्रिका, इतिवृत्तांचे सेट काढण्यासाठी सचिव विभागाकरीता दोन नवीन Riso Comcolor मशीन खरेदी करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, रक्कम रु. 38 लाख, 94 हजार 140 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |

**<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>**

**माहे 20 नोव्हेंबर 2019 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>संपुर्ण भारतात स्वच्छ भारत अभियान फार मोठया प्रमाणात राबविण्यात येत आहे. इंदौर महानगरपालिकेत देखील सदर अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले आहे. यास अनुसरुन नवी मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रात मध्यमवर्गीय तसेच अल्प उत्पन्न गटातील लोकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. छोटेखानी कार्यक्रम जरी गाव-पाडयात, वाडया-वस्तीत केले तरी किमान 400 ते 500 लोकांच्या जेवणावळी होतात. यासाठी ताटवाटया, लोटे भांडी इ. साहित्य त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना पेपर प्लेट प्लास्टिक कोटेड असल्यामुळे त्यांचा आधार घ्यावा लागतो. यामुळे कच-याचे साम्राज्य पसरते. यासाठी इंदौर महानगरपालिकेच्या धर्तीवर प्रत्येक विभाग कार्यालयाच्या माध्यमातुन एक बर्तनघर असावे. त्याच्या माध्यमातुन 400 ते 500 लोक जेवतील या प्रमाणात ताटवाटया, लोटीभांडी असे साहित्य नाममात्र दरात उपलब्ध करुन देण्यात यावे. यासाठी मा. प्रशासनाने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावा. जेणेकरुन स्वच्छता अभियानात महानगरपालिकेच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला जाण्यास मदत होईल. | 06<br>नोव्हेंबर | 1471<br>20/11/2019 | मंजूर |
| 2. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील,, यांजकडून :-**<br>स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत जनजागृती मोहिम राबविणे अतिशय गरजेचे आहे. ब-याच ठिकाणी पहाटे 5.00 वाजल्यापासुन रस्त्याच्या बाजूला प्रात:विधी करण्यासाठी लोक बसत असल्याचे चित्र दिसुन येते. यासाठी शालेय विदयार्थ्यांच्या माध्यमातुन पहाटे 5.00 ते सकाळी 7.00 वाजेपर्यत पथनाटयपर जनजागृती मोहिम राबविणे. | 07<br>नोव्हेंबर | 1472<br>20/11/2019 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97 मधील सेक्टर-18 येथील कै. तुकाराम ओंबळे समाजमंदीरामध्ये विभागातील विदयार्थ्यांसाठी वाचनालयाची सोय उपलब्ध करणे. | 11<br>नोव्हेंबर | 1473<br>20/11/2019 | मंजूर |
| 4. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97 मधील सेक्टर-18ए येथील ड्रेनेज लाईन कमी व्यासाची असुन तेथील नागरीकांना ड्रेनेज तुंबण्याच्या समस्येला वारंवार सामोरे जायला लागत असुन तेथे मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | 12<br>नोव्हेंबर | 1474<br>20/11/2019 | मंजूर |
| 5. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97 सेक्टर-20 डी टाईप बालाजी मंदीराच्या मागे भुखंड क्र. जी 1 ते जी 7 येथील महानगरपालिकेच्या भुखंडावर अनधिकृत झोपडया असुन त्यांच्यावर कायम स्वरुपी कारवाई करुन तेथे संरक्षक भिंत उभारुन उदयान विकसित करणे. | 13<br>नोव्हेंबर | 1475<br>20/11/2019 | मंजूर |
| 6. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45 मधील सेक्टर-3 कोपरखैरणे येथील चिकणेश्वर उदयानाची संरक्षक भिंतीची उंची वाढविणे तसेच स्टॅप कॉंक्रीट उदयानामध्ये करणे. | 20<br>नोव्हेंबर | 1476<br>20/11/2019 | मंजूर |
| 7. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45 मधील सेक्टर 3, 6, व 7 मधील अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती अथवा कॉंक्रीटीकरण करणे. | 21<br>नोव्हेंबर | 1477<br>20/11/2019 | मंजूर |
| 8. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>“ई” विभाग कार्यालयाच्या संरक्षक भिंतीची उंची वाढविणे. | 22<br>नोव्हेंबर | 1478<br>20/11/2019 | मंजूर |
| 9. | **श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 35 मधील भुखंड क्र. 5 सामाजिक सुविधा-2 या आरक्षित भुखंडावर घणसोली कॉलनीमधील नागरीकांकरीता सांस्कृतिक समाज हॉल, मुलांसाठी अभ्यासिका, लायब्ररी, व्यायामशाळा व बाजार मंडई करणे. | 26<br>नोव्हेंबर | 1479<br>20/11/2019 | मंजूर |
| 10. | **श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 35 घणसोली वसाहतीला लागुन असणा-या मोठया नाल्यामध्ये असणारा गाळ काढणे व नाल्याची दोन्ही बाजुनी संरक्षक भिंती बांधुन नाल्यामध्ये पीसीसी कायमस्वरुपी स्वरुपात करणे. | 27<br>नोव्हेंबर | 1480<br>20/11/2019 | मंजूर |
| 11. | **श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**<br>घणसोली सेक्टर-1 ते साईबाबा मंदीराकडे जाणा-या पामबीच रस्त्यावर मायक्रो सर्फेसिंग लेयर टाकुन सुधारणा करणे. | 28<br>नोव्हेंबर | 1481<br>20/11/2019 | मंजूर |
| 12. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून :-**<br>वोडाफोन गॅलरी ते हमलोग सोसायटीपर्यतचा दोन्ही बाजुचा , संदीप हॉटेल ते सिमिंदर सोसायटी पर्यतचा व पालवे गार्डनच्या बाजुचा व समोरील पदपथ तातडीने बनविण्यात यावा (पावसाळी गटर, नवीन गटाराची झाकणे, पदपथ सुशोभिकरण करणे). | 29<br>नोव्हेंबर | 1482<br>20/11/2019 | मंजूर |
| 13. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून :-**<br>ॲकरवाला स्कुल ते पी.के.सी. हॉस्पीटल लगतचा नाला बंद करुन सर्विस रोड निर्माण करणे. | 30<br>नोव्हेंबर | 1483<br>20/11/2019 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून :-**<br>वार्ड ऑफिसलगतची लॅण्ड मार्क सोसायटीपर्यतचा ते जुईनगर सोसायटीपर्यंतचा पदपथ नवीन सुशोभित करण्यात यावा. (नवीन कप स्टोन, संपुर्ण पदपथाला स्टॅप कॉक्रीट, बसण्यासाठी बेंचेस छोटे डेकोरीटिव, लाईटचे खांब व सर्व सोसा. वॉल कंपाउंड स्वच्छ भारत अंतर्गत् रंगरंगोटी करुन सेल्फी पॉईट, अशा सर्व सुख सोईनुसार बनविण्यात यावा). | 31<br>नोव्हेंबर | 1484<br>20/11/2019 | मंजूर |
| 15. | **श्री. राजेश शिवाजी शिंदे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या हददीमधील झोपडपटटीचा सन 2001 ला फोटोपास सर्वे झालेला आहे. अदयाप ही फोटोपासचे वितरण झालेले नाही. महाराष्ट्र शासनाच्या सन 2000 पर्यतच्या घरांना संरक्षणाच्या धोरणानुसार फोटोपास त्वरीत वाटप करुन पुढे झोपडपटटी पुर्नवसन योजना (SRA) च्या माध्यमातुन लोकांना हक्काचे घर मिळणेबाबत इमारत बांधण्याचा प्रस्ताव लवकरात लवकर आणणे. | 37<br>नोव्हेंबर | 1485<br>20/11/2019 | मंजूर |
| 16. | **श्री. राजेश शिवाजी शिंदे, यांजकडून :-**<br>तुर्भे स्टोअर ठाणे बेलापुर रोड येथील नियोजीत उडडाणपुलाच्या कामाची सुरवात अदयापही झालेली नाही. अनेक नागरीकांचा रस्ता ओलांडताना मृत्यु झालेले आहेत. शेकडो लोक जखमी झालेले आहेत. नियोजित उडडाणपुलाचे काम त्वरीत चालु करण्याची कारवाई व्हावी. | 38<br>नोव्हेंबर | 1486<br>20/11/2019 | मंजूर |
| 17. | **श्री. राजेश शिवाजी शिंदे, यांजकडून :-**<br>तुर्भे येथील डंपीग ग्राउंड बंद करुन इतरत्र ठिकाणी स्थलांतर करावे. सुमारे 15 वर्षापासुन येथील नागरीक डंपींग ग्राउंडमुळे त्रासलेले आहेत. अनेक रोगराई, दुर्गधीमुळे आजारी पडत आहेत. अनेकांचा मृत्युही झालेला आहे. तरी मानवतेच्या दृष्टीकोनातुन येथील डंपींग ग्राउंड बंद करुन इतरत्र ठिकाणी हलविणे. | 39<br>नोव्हेंबर | 1487<br>20/11/2019 | मंजूर |
| 18. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>नेरुळ CBSE क्र. 93 नर्सरी, ज्युनिअर के. जी, सिनियर के.जी. वर्ग खाजगी आणि अनुभवी संस्थेस चालविणे. | 40<br>नोव्हेंबर | 1488<br>20/11/2019 | मंजूर |
| 19. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>सीवुडस प्रभाग क्र. 108 मधील आरोग्य केंद्र तसेच डे केअर सेंटर तसेच नमुंमपा शाळेत सीसीटीव्ही लावणे. | 41<br>नोव्हेंबर | 1489<br>20/11/2019 | मंजूर |
| 20. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>सीवुडस प्रभाग क्र. 108 मध्ये महिला सक्षमीकरण केंद्र विकसित करणे. | 42<br>नोव्हेंबर | 1490<br>20/11/2019 | मंजूर |
| 21. | **श्रीम. सिमा गायकवाड, यांजकडून :-**<br>घणसोली येथील जुने ग्रामपंचायत कालीन जीर्ण झालेले मच्छीमार्केट तोडुन त्या जागी नवे सुसज्ज असे सर्व सुविधायुक्त मच्छिमार्केट/भाजी मार्केट बांधणे. | 46<br>नोव्हेंबर | 1491<br>20/11/2019 | मंजूर |
| 22. | **श्रीम. सिमा गायकवाड, यांजकडून :-**<br>घणसोली सेक्टर-8 येथील मोकळया भुखंड (राखीव) वर ESR/GSR पाण्याच्या टाक्या बसविणे. | 47<br>नोव्हेंबर | 1492<br>20/11/2019 | मंजूर |
| 23. | **श्रीम. सिमा गायकवाड, यांजकडून :-**<br>घणसोली सेक्टर-8, प्लॉट नं. 22 येथे सांस्कृतिक भवन बांधणे. | 48<br>नोव्हेंबर | 1493<br>20/11/2019 | मंजूर |

| | |
|---|---|
| तातडीचे कामकाज क्र. 412 दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागांतर्गत जाहिरात क्र. 01/2019 आणि जाहिरात क्र. 02/2019 नुसार निवड केलेल्या वैदयकिय अधिकारी/वैदयकिय तज्ञ यांची नियुक्ती करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 14/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशासन/आस्था-1/3933/2019. |
| ठराव क्र. 1494 दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागांतर्गत जाहिरात क्र. 01/2019 आणि जाहिरात क्र. 02/2019 नुसार निवड केलेल्या वैदयकिय अधिकारी/वैदयकिय तज्ञ यांची नियुक्ती करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रस्तावातील अ.क्र. 1 ते 27 प्रमाणे वैद्यकिय अधिकारी/ वैद्यकिय तज्ञ यांना नियुक्ती आदेश देणेस, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(1) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **स्थगित** |
| तातडीचे कामकाज क्र. 413 दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-2020, निवडणुकीकरीता आवश्यक असणा-या विविध साहित्य निहाय होणा-या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणे व अर्थसंकल्पीय तरतुद करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 14/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/निवडणुक/203/2019. |
| ठराव क्र. 1495 दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-2020, निवडणुकीकरीता आवश्यक असणा-या विविध साहित्य निहाय होणा-या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणे व अर्थसंकल्पीय तरतुद करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 16 कोटी, 32 लाख मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| तातडीचे कामकाज क्र. 414 दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | स्थायी समितीच्या शुक्रवार, दिनांक 15 नोव्हेंबर 2019 चा ठराव क्र. 280 :-<br>"**संदर्भ** :- आयुक्तांचे दिनांक 14 नोव्हेंबर 2019 चे पत्र<br>जा.क्र.नमुंमपा/लेखा/1206/2019.<br>"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, सन 2019-20 च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये वाढ/घट रु. 2650.00 लक्ष असा एकत्रित मुळ मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीवर निरंक परिणाम करणारा पुर्नविनियोजन प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम - 103 नुसार मा. सर्वसाधारण सभेत प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| ठराव क्र. 1496 दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "सन 2019-20 च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये वाढ/घट रु. 2650.00 लक्ष असा एकत्रित मुळ मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीवर निरंक परिणाम करणारा पुर्नविनियोजन करणेच्या प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम- 103 अन्वये सुचविल्याप्रमाणे, मा. सर्वसाधारण सभेची मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| तातडीचे कामकाज क्र. 415 दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | तुर्भे सेक्टर-18 वारणा चौक येथील सायन-पनवेल महामार्गालगत ड्रेन बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 15/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./2633/ 2019. |
| ठराव क्र. 1497 दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "तुर्भे से.18 वारणा चौक येथील सायन-पनवेल महामार्गालगत ड्रेन बांधणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, रक्कम रु. 1 कोटी, 68 लाख, 76 हजार 851 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |

| | |
|---|---|
| **तातडीचे कामकाज क्र. 416**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा कातकरीपाडा, राबाडे, नवी मुंबई या ठिकाणी कनिष्ठ महाविदयालय (इयत्ता 11वी व 12वी) सुरु करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 15/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/शि.वि./3167/ 2019. |
| **ठराव क्र. 1498**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा कातकरीपाडा, राबाडे, नवी मुंबई या ठिकाणी कनिष्ठ महाविदयालय (इयत्ता 11वी व 12वी) सुरु करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून सुरू करणेस व त्यावरील होणाऱ्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 417**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | कोपरखैरणे विभागातील सेक्टर- 1, 1ए, 2ए, ते सेक्टर- 4, 4ए, सेक्टर 5 ते 8, सेक्टर- 9, 11 आणि 14, सेक्टर - 15 ते 18 आणि सेक्टर- 22, 23 मधील रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 15/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./2634/ 2019. |
| **ठराव क्र. 1499**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "कोपरखैरणे विभागातील सेक्टर-1, 1ए, 2ए, ते सेक्टर-4, 4ए, सेक्टर 5 ते 8, सेक्टर- 9,11 आणि 14, सेक्टर - 15 ते 18 आणि सेक्टर - 22, 23 मधील रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 10 कोटी, 75 लाख, 69 हजार 371 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 418**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56(1)(ब) च्या तरतुदीनुसार श्री मनोजकुमार नरेंद्रकुमा सुतार, वरिष्ठ लिपिक (लेखा) यांचे निलंबन मा. महानगरपालिकेस कळवुन कायम करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशा/आस्था-6/प्र.क्र.फ/3952/2019. |
| **ठराव क्र. 1500**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56(1)(ब) च्या तरतुदीनुसार श्री मनोजकुमार नरेंद्रकुमार सुतार, वरिष्ठ लिपिक (लेखा) यांचे निलंबन मा. महानगरपालिकेस कळवुन कायम करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मा. महानगरपालिकेने निलंबनाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या मुदतीत उक्त कर्मचाऱ्याचे निलंबन विभागीय चौकशीच्या अधिन राहुन कायम करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **स्थगित** |
| **तातडीचे कामकाज क्र. 419**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेसाठी नवीन सक्शन युनिट वाहने खरेदी करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/वाहन/425/2019. |
| **ठराव क्र. 1501**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नवी मुंबई महानगरपालिकेसाठी नवीन सक्शन युनिट वाहने खरेदी करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नवी मुंबई महानगरपालिकेसाठी नवीन सक्शन युनिटकरिता 4 नविन वाहने खरेदीसाठी एकूण रक्कम रु. 80 लाख, 22 हजार 710 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |

| | |
|---|---|
| तातडीचे कामकाज क्र. 420<br>दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीस स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध करुन देणेकरीता तयार करण्यात आलेल्या “प्रतिक्षा यादी” अर्जाच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/2842/2019. |
| ठराव क्र. 1502<br>दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीस स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध करुन देणेकरीता तयार करण्यात आलेल्या “प्रतिक्षा यादी” अर्जाच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सद्यस्थितीतमध्ये दिव्यांगांना स्वयंरोजगाराकरिता जागा वाटप करण्यासाठी महानगरपालिकेकडे जागा शिल्लक नाहीत. तथापि, दिनांक 11/02/2019 रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत अनुसरून 714 जागांककरिता मागणी अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध करून देण्याकरीता सिडकोकडे जागेची मागणी करणे आवश्यक असून सिडकोकडून जागा प्राप्त झाल्यानंतर संगणकीय सोडत (Computeries Lottery) पध्दतीने जागा वाटप करण्याच्या धोरणास, सुचविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 77 अन्वये, मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | **स्थगित** |
| तातडीचे कामकाज क्र. 421<br>दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | तुर्भे क्षेपणभुमी येथील पाचवा सेल SWM Rule 2016 नुसार शास्त्रोक्त पध्दतीने बंद करणे या कामास सुधारी प्रशासकिय मंजुरी मिळणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./2651/2019. |
| ठराव क्र. 1503<br>दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "तुर्भे क्षेपणभुमी येथील पाचवा सेल SWM Rule 2016 नुसार शास्त्रोक्त पध्दतीने बंद करणे या कामास सुधारीत प्रशासकिय मंजुरी मिळणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 20 कोटी, 04 लाख, 68 हजार 909 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | **मंजूर** |
| तातडीचे कामकाज क्र. 422<br>दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | कै.गौरव म्हात्रे कला केंद्र व वाचनालय इमारतीमध्ये स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरु करणेच्या सुधारीत प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/स.वि.वि./म.ग्रं./3144/2019. |
| ठराव क्र. 1504<br>दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "कै.गौरव म्हात्रे कला केंद्र व वाचनालय इमारतीमध्ये स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरु करणेच्या सुधारीत प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रामधील संचालक या पदाचे नाव केंद्रप्रमुख करणेस, केंद्रप्रमुख, ग्रंथपाल/सहा. ग्रंथपाल, वरिष्ठ लिपिक/कनिष्ठ लिपिक, शिपाई/ग्रंथालय परिचर व सफाई कामगार यांच्या नेमणूका मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 53(3) अन्वये मा. आयुक्त, यांना प्राप्त अधिकारानुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात 06 महिन्यांकरिता ठोक मानधनावर नेमणूक करणेस, केंद्रप्रमुख यांची नेमणूक रू. 50,000/- प्रती महा मानधनावर करणेस, **अनामत रक्कम रु. 5000/- ही बाब वगळणेस आणि MPSC व UPSC साठी प्रस्तावित 40 ऐवजी प्रत्येकी 50 विद्यार्थी मर्यादा वाढविणे, ऐरोली येथे सदर केंद्राची उप शाखा सुरु करणे या सुधारणांसह** सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | **सुधारणेसह मंजूर** |

| | |
|---|---|
| **तातडीचे कामकाज क्र. 423**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नामकरण प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/मा.ज.स.सं-3/603/2019. |
| **ठराव क्र. 1505**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नामकरणच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, 1) शिरवणे प्रभाग क्र. 81 मध्ये प्लॉट क्र. 33, 132, 606 या ठिकाणी निर्माण झालेल्या चौकास **"माजी सरपंच कै. बुधाजी आंबो म्हात्रे चौक"** 2) शिरवणे प्रभाग क्र. 81 मध्ये प्लाट क्र. 194, 71, 678, 70 यामधून जाणाऱ्या रस्त्यावरील चौकास **"कै. गणपत महादू घरत चौक"** 3) शिरवणे प्रभाग क्र. 81 मध्ये ठाणे-बेलापूर मार्गापासून लघुउद्योग संकुलातील भूखंड क्र. 33 व त्रिवेणी को. ऑप. हौ. सोसायटी, भूखंड क्र. 559 बी पासून जाणाऱ्या रस्त्यास **"कै.रमेश दामू सुतार मार्ग"** 4) नेरूळ प्रभाग क्र. 88 सेक्टर 3 येथील दैनंदिन बाजार जवळील बाजार जवळीक उद्यानाचे **"नारी गौरव उद्यान"** असे नामकरण देण्यासंबंधातील, आयुक्तांच्या प्रस्तावास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 424**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नामकरण प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/मा.ज.स.सं-3/604/2019. |
| **ठराव क्र. 1506**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नामकरणच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रभाग समितीतील मंजूर नामकरण प्रस्तावाप्रमाणे **प्रवेशद्वार, चौक, संवाद केंद्र, मार्ग, उद्यान** बाबतचे नामकरण देण्यासबंधातील आयुक्तांच्या प्रस्तावास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 425**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 93 सी.बी.एस.ई. नेरुळ, सेक्टर-50 या शाळेतील पुर्व प्राथमिक वर्ग मे. आकांशा फाऊंडेशन यांना चालविण्यास देण्यास परवानगी देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/शि. वि./3193/2019. |
| **ठराव क्र. 1507**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | ."नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 93 सी.बी.एस.ई. नेरुळ, सेक्टर-50 या शाळेतील पुर्व प्राथमिक वर्ग मे. आकांक्षा फाऊंडेशन यांना चालविण्यास देण्यास परवानगी देणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नमुंमपा शाळा क्र. 93, सी.बी.एस.ई. सेक्टर-50, नेरूळ या शाळेचे पूर्व प्राथमिक वर्ग (ज्युनिअर के.जी. व सीनिअर के.जी.) मे. आकांक्षा फाऊंडेशन यांना प्राथमिक शाळेच्या केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार चालविणेस देणेस तसेच 1) **मे. आकांक्षा फाउंडेशन यांनी केलेल्या कामकाजाचा आढावा दरवर्षी प्रशासनाने घेऊन याबाबतचा अहवाल महानगरपालिकेमध्ये सादर करणे. 2) CBSE च्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेसाठी यापुर्वी झालेली शिक्षक भरती रदद करुन, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणा-या शिक्षकांची नव्याने भरती मे. आकांक्षा फाउंडेशन यांच्या माध्यमातुन करणे व त्यावर महानगरपालिकेने नियंत्रण करणे. 3) शिक्षक, महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व पालक यांच्यासमवेत संयुक्त तिमाही बैठक घेणे या सुधारणांसह** पूर्व प्राथमिक वर्गातील बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांचे वेतनावरील एकूण रक्कमेतील खर्चापैकी 55% खर्च महानगरपालिकेने अदा करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **सुधारणेसह मंजूर** |

| | |
|---|---|
| **तातडीचे कामकाज क्र. 426**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात 3 वर्षाकरीता कोंडवाडा व्यवस्थापनाचे काम कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी मा. महासभेची प्रशासकिय मान्यता मिळणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/11/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/पसे/ 268/2019. |
| **ठराव क्र. 1508**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात 3 वर्षाकरीता कोंडवाडा व्यवस्थापनाचे काम कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी मा. महासभेची प्रशासकिय मान्यता मिळणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, निश्चित करण्यात येणाऱ्या एजन्सीस पालिकेचा कोंडवाडा भाडेमुक्त तत्वावर देणे याबाबींसह नमुंमपा कार्यक्षेत्रात 3 वर्षाकरिता कोंडवाडा व्यवस्थापनाचे काम कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी “कोंडवाडा व्यवस्थापन” या लेखाशिर्षाखाली अंदाजे वार्षिक रू. 73.94 लक्ष याप्रमाणे तीन वर्षाकरिता एकत्रित रू. 221.82 लक्ष अपेक्षित खर्चास महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम 1949 मधील कलम 73 (क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 427**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या प्रस्तावाबाबत |
| **ठराव क्र. 1509**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, आर्थिक व दुर्बल घटकातील शाळेत जाणाऱ्या इयत्ता 1 ली ते महाविद्यालयीन पर्यंतच्या मुला-मुलींना शिष्यवृत्तीचे विरतण करणे या योजनेकरीता तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्न दाखल्याची अट लागू करणेस, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता क्रिमिलेयर मधील उत्पन्न मर्यादा रू. 8.00 लक्ष यानुसार उत्पन्नाची मर्यादा वाढविणे, सन 2019-20 या आर्थिक वर्षात व पूढे उपरोक्त नमूद केलेल्या अटी शर्तीसहित शिष्यवृत्तीची योजना राबविण्यास, तसेच अंदाजपत्रकीय मंजूरीच्या मर्यादेच्या खर्चास अधिन राहून शिष्यवृत्तीच्या योजना राबविणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 428**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ऍम्फीबीअस बस प्रकल्प सुरु करणेच्या प्रस्तावाबाबत आयुक्तांचे दिनांक 30/05/2018 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/मालमत्ता/1589/2018. |
| **ठराव क्र. 1510**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ऍम्फीबीअस बस प्रकल्प सुरु करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मा.महासभेमध्ये सादर केलेल्या मुळ प्रस्तावाची अंमलबजावणी करणेसाठी जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट समवेत सामज्यस् करारनामा (MOU) करण्यात येत असून सदरची बाब **दप्तरी दाखल** करण्यात यावा." |
| **निर्णय** | **दप्तरी दाखल** |

| | |
|---|---|
| **तातडीचे कामकाज क्र. 429**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नेरुळ विभागातील सेक्टर-19 वंडर्स पार्क लगत सायकल ट्रॅक बनविणेच्या प्रस्तावाबाबत आयुक्तांचे दिनांक 17/07/2019 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/श.अ./1567/2019. |
| **ठराव क्र. 1511**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नेरुळ विभागातील सेक्टर-19 वंडर्स पार्क लगत सायकल ट्रॅक बनविणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 45 लाख, 63 हजार मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **नामंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 430**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "तुर्भे सेक्टर-18 येथील मल:निस्सारण प्रकल्पाच्या उर्वरित जागेत Bio-Methanation Bottling Plant बांधणे व 15 वर्ष प्रक्रिया प्रकल्पाच्या दैनदिन देखभाल व दुरुस्तीकरीता सर्वसमावेशक कंत्राटाच्या प्रस्तावाबाबत आयुक्तांचे दिनांक 17/07/2019 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/श.अ./1581/2019 |
| **ठराव क्र. 1512**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "तुर्भे सेक्टर-18 येथील मल:निस्सारण प्रकल्पाच्या उर्वरित जागेत Bio-Methanation Bottling Plant बांधणे व 15 वर्ष प्रक्रिया प्रकल्पाच्या दैनदिन देखभाल व दुरुस्तीकरीता सर्वसमावेशक कंत्राटाच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, ढोबळ अंदाजपत्रकीय एकूण रक्कम रु. 34 कोटी, 20 लाख मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **नामंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 431**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उरण नगरपरिषदे मधील मेला हा नवी मुंबई महानगरपालिकेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये (STP) टाकणेस परवानगी मिळणेस व सामंजस्य करार करणेच्या प्रस्तावाबाबत आयुक्तांचे दिनांक 16/08/2019 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/श.अ./1841/2019 |
| **ठराव क्र. 1513**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उरण नगरपरिषदे मधील मेला हा नवी मुंबई महानगरपालिकेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये (STP) टाकणेस परवानगी मिळणेस व सामंजस्य करार करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नवी मुंबई महानगरपालिका व उरण नगरपरिषद यांचेमध्ये वेळोवेळी करावयाच्या सामंजस्य करारावर (MOU) स्वाक्षरी करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **नामंजूर** |
| **तातडीचे कामकाज क्र. 432**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2018-19 या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थिती दर्शक अहवालास मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावाबाबत आयुक्तांचे दिनांक 31/07/2019 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/श.अ./1762/2019 |
| **ठराव क्र. 1514**<br>**दिनांक 20 नाव्हेंबर 2019** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2018-19 या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थिती दर्शक अहवालास मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |

| | |
|---|---|
| तातडीचे कामकाज क्र. 433<br>दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका शहरास कचरा मुक्त शहराचे 7 स्टार रेटींग प्राप्त करण्यास प्रस्तावाताबाबत आयुक्तांचे दिनांक 19/11/2019 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/उ.आ.(स्व.म.अ)/323/2019 |
| ठराव क्र. 1515<br>दिनांक 20 नाव्हेंबर 2019 | "स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका शहरास कचरा मुक्त शहराचे 7 स्टार रेटींग प्राप्त करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**